**ठळक बातम्या**

- जागतिक आव्हानांचा सामना एकजुटीनं करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ग्लोबल साऊथ शिखर बैठकीत विकसनशील देशांना आवाहन

- ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने’च्या निधी हस्तांतरणाला पुण्यात औपचारिक प्रारंभ

- कोलकातामधल्या डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ डॉक्टरांचा देशव्यापी संप, आरोग्यसेवा प्रभावित

**आणि**

- डॉक्टरांच्या सुरक्षेसंदर्भात करायच्या उपाययोजनासंदर्भात समिती स्थापन करण्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचं आश्वासन

**<><><><><>**

अनिश्चितता, भूराजकीय युद्ध, रोगराई अशा जागतिक आव्हानांचा सामना विकसनशील देशांनी एकजुटीनं करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. व्हॉईस ऑफ ग्लोबल साऊथ संघटनेच्या शिखर बैठकीत ते बोलत होते. दूरस्थ पद्धतीनं ही बैठक झाली. वातावरण बदल, आरोग्य, खाद्य आणि ऊर्जा सुरक्षेचा सामना या देशांना करावा लागतो आहे. दहशतवाद, कट्टरतावाद आणि फुटीरतावाद हे देखील समाजाला धोकादायक असल्याचं ते म्हणाले. व्यापार आणि दळणवळणाला प्रोत्साहन, शाश्वत विकास उद्दिष्ट आणि महिलांचा; ‘विकास प्रक्रीयेत’ वाढता सहभाग या मुद्द्यांवर भारत प्रतिबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं.

किफायती तंत्रज्ञानाची देवाण घेवाण आणि वित्तपुरवठ्याचा ओघ सुकर करण्याच्या दृष्टीनं ग्लोबल साऊथ संघटनेच्या सदस्य देशांनी सलोख्याने व्यवहार करावे असं आवाहन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी केलं आहे. ग्लोबल साऊथ संघटनेच्या तिसऱ्या शिखर बैठकीत आज ते बोलत होते. जागतिक पातळीवर विविध क्षेत्रातल्या संघर्ष आणि तणावाचा दुष्परिणाम विकसनशील देशांना सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत आपलं परस्पर हित समजून घेण्यासाठी ग्लोबल साऊथ संघटना कार्यरत आहे, असं ते म्हणाले. सद्यस्थितीत जागतिक अर्थव्यवस्थेतली जोखीम कमी करण्यासाठी उत्पादनप्रक्रीयेचं मोठ्या प्रमाणावर विकेंद्रीकरण करण्याची आवश्यकता असल्याचं जयशंकर म्हणाले.

जगभरातल्या देशांच्या विकास योजनात ग्लोबल साऊथनं मोठी भूमिका घ्यावी, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं. या परिषदेतल्या अर्थमंत्र्यांच्या सत्रात त्या बोलत होत्या. परस्पर सहकार्य वाढवून विकासाची उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सहकार्य करण्याचं आवाहन त्यांनी सर्व देशांना केलं.

**<><><><><>**

आर्थिक वर्ष २०२३-२४मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ अपेक्षेपेक्षा खूप चांगली झाल्याचं मत, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या पहिल्या व्यवस्थापकीय उपसंचालक डॉ. गीता गोपीनाथ यांनी मांडलं आहे. २०२७पर्यंत भारत जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. येत्या ५ ते ६ वर्षांमध्ये देशात कोट्यावधी नवे रोजगार निर्माण करावे लागतील, असंही गोपीनाथ यांनी नमूद केलं. उत्पादनांचा व्यक्तिगत वापर पूर्वपदावर येण्याची आणि कृषी उत्पादन वाढण्यासाठी चांगला पाऊस होण्याची नाणेनिधीची अपेक्षा असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'साठी वर्षभराची आर्थिक तरतूद केलेली आहे. महिलांना आत्मसन्मान मिळवून देण्याची शासनाची इच्छा असून त्यांच्या विकासाच्या योजना राबविण्यासाठी हात आखडता घेणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. लाडकी बहीण योजनेअंतर्गत निधी हस्तांतरणाची औपचारिक सुरुवात करण्यासाठी पुण्यात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महिलांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्ट पर्यंत मुदत आहे. अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल, असंही ते म्हणाले. बँक खाते आधार क्रमांकाशी जोडले गेल्यानंतर त्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्थाही वेगाने वाढणार आहे. या योजनेसाठी दरवर्षी अर्थसंकल्पातही तरतूद केली जाणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आजपर्यंत १ कोटी ३ लाख रुपये माता-भगिनींच्या बँक खात्यात जमा झाले आहेत, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. या योजनेद्वारे २ कोटींपेक्षा अधिक महिलांना लाभ देण्याचा प्रयत्न असल्याचं महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं.

यावेळी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक विजेत्या स्वप्नील कुसळेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जिल्हास्तरीय औपचारिक लाभ हस्तांतरणही आज व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे झालं. यावेळी विविध मंत्री उपस्थित होते.

**<><><><><>**

मैसूरू शहरी विकास प्राधिकरण भूखंड घोटाळा प्रकरणी कर्नाटकाचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर खटला चालवण्याची परवानगी कर्नाटकाचे

राज्यपाल थावरचंद गहलोत यांनी दिली आहे. गेहलोत यांनी २६ जुलै रोजी सिद्धरामय्या यांना कारणे दाखवा नोटिस बजावून, त्यांच्यावर खटला का चालवण्यात येऊ नये, याची कारणं सात दिवसांच्या आत देण्याची सूचना केली होती. कर्नाटक मंत्रिमंडळानं याला विरोध केला होता आणि राज्यपाल घटनात्मक पदाचा गैरवापर करत असल्याचा आरोप केला होता. सिद्धरामय्या यांनी मैसूरू शहरी विकास प्राधिकरणाचे पर्यायी भूखंड त्यांच्या कुटुंबाला देण्यासाठी गैरप्रकार करून जवळपास ५६ कोटी रुपयांचा भूखंड मिळवल्याचा आरोप सिद्धरामय्या यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

**<><><><><>**

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात महिला डॉक्टरवर बलात्कार आणि तिची हत्या झाल्याच्या घटनेनंतर देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ भारतीय वैद्यकीय संघटनेनं आज एक दिवसाचा देशव्यापी संप पुकारला आहे.

देशभरात विविध भागात डॉक्टर संघटनेनं संपाला प्रतिसाद दिला असून सामान्य रुग्णालयात रुग्णसेवा बंद आहेत. मुंबईत जे.जे. रुग्णालयासह अन्य रुग्णालयांचे डॉक्टर आणि वैद्यकीय संघटना या संपात सहभागी झाल्या आहेत.

**पुण्यातल्या** ससून रुग्णालय आणि बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांनीही यात सहभाग घेतला. यामुळं बाह्य रुग्ण विभागातल्या रुग्णांची संख्या कमी झाली तसंच शस्त्रक्रियांच्या संख्येतही घट झाली. अत्यावश्यक विभागातली सेवा, अत्यावश्यक शस्त्रक्रिया सुरळीतपणे सुरू आहे.

**छत्रपती संभाजीनगर** इथंही क्रांतीचौकात निदर्शनं झाली. शहरातील काही खासगी वैद्यकीय रुग्णालयं, वैद्यकीय व्यावसायिक आणि प्रशिक्षणार्थी डॉक्टरांची मार्ड संघटना या संपात सहभागी झाली आहे.

**हिंगोलीत** डॉक्टर हेडगेवार स्मृती रुग्ण सेवा मंडळ आणि दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तर धुळ्यात श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवासी डॉक्टरांनी ठिय्या आंदोलन केलं. **नांदेड** जिल्ह्यात निमा, मार्ड आदी संघटनांच्या वतीने आज निषेध मोर्चा काढण्यात आला.

**भंडारा, यवतमाळमध्ये** डॉक्टरांच्या विविध संघटनांनी मूकमोर्चा काढला. **नागपूर** इथंही इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीनं आज निषेध आंदोलन करण्यात आलं. **बुलढाणा** जिल्ह्यात ठिकठिकाणी या घटनेचा निषेध करण्यात आला.

याप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केंद्रीय सार्वजनिक आरोग्य मंत्री जे. पी. नड्‌डा यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी केंद्रीय स्तरावर एक कडक कायदा तयार करण्यावर यावेळी चर्चा झाली.

डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी यांनी त्यांचे आंदोलन मागे घ्यावे. सरकार त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक कारवाई करत असून त्यांच्या सुरक्षिततेसाठी कटीबद्ध आहे, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे.

**<><><><><>**

डॉक्टरांच्या सुरक्षेसंदर्भात करायच्या उपाययोजनासंदर्भात एक समिती स्थापन करण्याचं आश्वासन केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं दिलं आहे. डॉक्टरांच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी आज नवी दिल्लीत मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यावेळी अधिकाऱ्यांनी हे आश्वासन दिलं. या समितीमध्ये डॉक्टरांचे प्रतिनिधी, राज्य सरकार यांचेही प्रतिनिधी असतील. डॉक्टरांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी २६ राज्यात कायदे मंजूर झालेले आहेत. डॉक्टरांनी आंदोलन मागे घेऊन कामावर रुजू व्हावं, असं आवाहन केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

देशात आत्तापर्यंत मंकीपॉक्स आजाराचा एकही रुग्ण आढळलेला नाही, असं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. मंकीपॉक्स हा आजार गंभीर स्वरूपाचा असून जागतिक पातळीवर याबद्दल WHO अर्थात जागतिक आरोग्य संघटनेनं सतर्कता जाहीर केली आहे, त्या पार्श्वभूमीवर आरोग्य मंत्रालयानं आज स्पष्टीकरण दिलं. केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी आज नवी दिल्ली इथं झालेल्या एका बैठकीत मंकीपॉक्स या आजाराची देशातली परिस्थिती आणि उपयायोजनांच्या तयारीचा आढावा घेतला. या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व यंत्रणांना सज्ज राहण्याचे आदेश या बैठकीत देण्यात आले. मंकीपॉक्स संसर्गाचे रुग्ण दोन ते चार आठवड्यात बरे होतात त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये, आरोग्य मंत्रालय परिस्थितीवर बारकाईनं लक्ष ठेवून असल्याचं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरील रामाफोसा यांनी आज या आजाराच्या वेगानं होणाऱ्या संसर्गाबद्दल चिंता व्यक्त केली असून दक्षिण आफ्रिकेला आंतरराष्ट्रीय पातळीवरून सहकार्य मिळावं, असं आवाहन केलं आहे. आफ्रिकेत आत्तापर्यंत या आजाराचे एकूण सतरा हजार ५४१ बाधित रुग्ण आढळले असून ५१७ मृत्यूंची नोंद झाल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

हरियाणामधल्ये जननायक जनता पक्षाच्या ४ आमदारांनी आज राजीनामा दिला. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाचे १० आमदार निवडून आले होते. त्यानंतर पक्षानं भाजपासोबत युती केली होती पण लोकसभा निवडणुकीपूर्वी ती मोडली. लोकसभा निवडणुकीत जननायक जनता पक्षाचा एकही उमेदवार निवडून आला नव्हता.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशमध्ये कानपूर जिल्ह्यात साबरमती एक्सप्रेसचे २० डबे रुळावरून घसरले. ही गाडी वाराणसीहून अहमदाबादकडे जात असताना कानपूर रेल्वे स्थानकाजवळ आज पहाटे अडीचच्या सुमारास हा अपघात झाला. तीक्ष्ण वस्तूवर इंजिन आपटल्यामुळे डबे घसरल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात दिली आहे. या अपघातात जीवितहानी झाली नाही.

**//<><><><><>//**